आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक  बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

१६ सप्टेंबर २०२४ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- हरित ऊर्जेच्या क्षेत्रात जगाचं नेतृत्व करण्यासाठी भारत सज्ज असल्याचं प्रधानमंत्र्यांचं नवीकरणीय उर्जा क्षेत्रातल्या गुंतवणूकदार परिषदेत प्रतिपादन

- राज्यातल्या ३ वंदे भारत रेल्वेगाड्यांना प्रधानमंत्री आज दूरस्थ पद्धतीने   हिरवा झेंडा दाखवणार

- राज्यभरात उद्या, अनंत चतुर्दशीच्या पार्श्वभूमीवर गणेश विसर्जनासाठी प्रशासन सज्ज

**आणि**

- देशात अनेक ठिकाणी ईद ए मिलाद चा उत्साह

**<><><><><>**

हरित ऊर्जेच्या क्षेत्रात जगाचं नेतृत्व करण्यासाठी भारत सज्ज असून याचाच भाग म्हणून सरकारनं २० हजार कोटी रुपयांच्या ग्रीन हायड्रोजन मिशनला सुरुवात केली आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. ते आज गुजरातमधे गांधीनगर इथं आयोजित चौथ्या जागतिक नवीकरणीय ऊर्जा क्षेत्रातल्या गुंतवणूकदारांच्या परिषदेत बोलत होते. केंद्रीय नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाने या परिषदेचं आयोजन केलं आहे. या परिषदेला संबोधित करताना प्रधानमंत्र्यांनी भारताने ऊर्जा क्षेत्रात केलेल्या प्रगतीचा आढावा घेतला. ते म्हणाले....

**बाईट- प्रधानमंत्री (३० सेकंद)**

भारतानं हरित ऊर्जा क्षेत्रात प्रगती साधण्यासाठी अनेक महत्वाचे निर्णय घेतले आहेत. ३१ हजार मेगावॅट जलविद्युत निर्मितीच्या प्रकल्पाचं काम सुरू असून यासाठी

१२ हजार कोटी रुपये खर्च येणार असल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. सौर ऊर्जा, पवन ऊर्जा यांच्या आधारावर देशाचं भविष्य बांधण्याचा सरकारचा प्रयत्न आहे, असं प्रधानमंत्री म्हणाले. यावेळी त्यांनी पीएम सूर्यघर योजनेच्या यशाबद्दल कौतुक केलं. आतापर्यंत देशभरातल्या सव्वा तीन लाख घरांमध्ये सौर पॅनल बसवण्यात आले आहेत. भविष्यात देशातलं प्रत्येक घर ऊर्जा निर्मिती केंद्र होईल. २१ व्या शतकाचा इतिहास लिहिला जाईल तेव्हा भारताच्या सौर क्रांतीचा इतिहास सुवर्ण अक्षरांनी लिहिला जाईल, असं प्रधानमंत्री म्हणाले. सौर पंपाद्वारे शेतकऱ्याला आत्मनिर्भर बनवण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचंही ते म्हणाले.

देशातल्या गरीब, पीडित, दलित जनतेला सन्मानाचं आयुष्य मिळेल याची खात्री हे सरकार देतं असं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. देशाला तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनवण्यासाठी १४० कोटी देशवासी झोकून देऊन काम करत असून आजची परिषद ही याच ध्येयाचा एक भाग असल्याचं प्रधानमंत्री म्हणाले. या परिषदेला गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल, आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू आदी उपस्थित होते. ३ दिवस चालणाऱ्या या परिषदेत महाराष्ट्रासह देशातली अनेक राज्यं सादरीकरण करणार आहेत. तसंच देशोदेशीहून मोठ्या संख्येनं प्रतिनिधी परिषदेत सहभागी होत आहेत.  या कार्यक्रमानंतर प्रधानमंत्र्यांनी गुजरातमधल्या अहमदाबाद ते गांधीनगर या मेट्रोच्या दुसऱ्या टप्प्याचं उद्घाटन केलं. तसंच मेट्रोतून प्रवासा दरम्यान विद्यार्थी आणि सहप्रवाशांशी संवाद साधला. यानंतर मोदी अहमदाबाद ते भुज या वंदे भारत मेट्रोच्या उद्घाटनासह ८ हजार कोटी रुपयांच्या प्रकल्पांची पायाभरणी करतील. अहमदाबाद ते भुज ही देशातली पहिली वंदे भारत मेट्रो आहे.

<><><><><>

राज्यातल्या तीन नवीन वंदे भारत एक्स्प्रेसचं आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून लोकार्पण होणार आहे. यामध्ये पुणे-हुबळी, कोल्हापूर-पुणे आणि नागपूर-सिकंदराबाद या तीन रेल्वे गाड्यांचा समावेश आहे. केंद्रीय सहकार आणि नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ पुण्यातून या रेल्वेला हिरवा झेंडा दाखवणार आहेत. पुणे-हुबळी आणि कोल्हापूर-पुणे या दोन्ही गाड्या आठवड्यातून प्रत्येकी तीन दिवस धावणार आहेत.

**<><><><><>**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी कर्नाटकातल्या गणपती विसर्जनाबाबत खोटी बातमी पसरवून राज्यात धार्मिक तेढ निर्माण केल्याचा आरोप प्रदेश काँग्रेसनं केला आहे. याबद्दल त्यांच्यावर गुन्हा दाखल करून कारवाई करावी अशी मागणी करत, प्रदेश काँग्रेसच्या विधि विभागाचे अध्यक्ष रविप्रकाश जाधव यांनी कुलाबा पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दाखल केली आहे.

भाजपाचे आमदार नितेश राणे यांनी या संदर्भात खोटी माहिती प्रसारित करून समाजात तेढ आणि धार्मिक तणाव निर्माण करण्याचा, तसंच सामाजिक शांतता भंग करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे त्यांच्यावर गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी काँग्रेसनं केली आहे.

**<><><><><>**

महाविकास आघाडीचं सरकार राज्यात सत्तेत आल्यावर जुनी निवृत्तीवेतन योजना लागू करण्याचा निर्णय पहिल्याच मंत्रिमंडळ बैठकीत घेतला जाईल, असं काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी सांगितलं. शिर्डी इथं आयोजित निवृत्तीवेतन राज्य महा अधिवेशनात ते बोलत होते. जुनं निवृत्तीवेतन हा कर्मचाऱ्यांचा हक्क आहे, असं पटोले म्हणाले.

**<><><><><>**

आठव्या भारत जल सप्ताह २०२४ ची सुरुवात उद्या नवी दिल्लीतल्या भारत मंडपम इथं होणार असून राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू या कार्यक्रमाचं उद्घाटन करतील. चार दिवसांच्या या कार्यक्रमात ४० देशातले दोनशे प्रतिनिधी सहभागी होतील. या कार्यक्रमात शंभरहून अधिक दालनं आणि जलक्षेत्रातले स्टार्टअप्स आपल्या संकल्पना मांडतील.

**<><><><><>**

मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त छत्रपती संभाजीनगर इथल्या सिद्धार्थ उद्यानात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते उद्या ध्वजारोहण होणार आहे.

**<><><><><>**

राज्यभरात उद्या, अनंत चतुर्दशीच्या दिवशी गणरायाला निरोप दिला जाणार आहे. यासाठी विविध ठिकाणी स्थानिक प्रशासन सज्ज झालं आहे.

**बृहन्मुंबई महानगरपालिकेनं** यंदा पर्यावरणपूरक गणेशोत्सवाला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशानं गणेशमूर्तींचं विसर्जन करण्यासाठी २०४ कृत्रिम तलाव तयार केले आहेत. या तलावांची माहिती भाविकांना क्यूआर कोडद्वारे मिळणार आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेचे १२ हजार अधिकारी-कर्मचारी, ७१ नियंत्रण कक्ष, इतर सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. चौपाट्यांवर ७६१ जीवरक्षक आणि ४८ मोटरबोटी तैनात केल्या आहेत. निर्माल्य वाहनं, ६६ निरीक्षण मनोरे, एक हजारापेक्षा जास्त फ्लडलाइट, २७ सर्चलाईट, रुग्णवाहिका अशी जय्यत तयारी महानगरपालिकेनं केली आहे.

**पुण्यात** विसर्जन मिरवणुकीच्या अनुषंगानं वाहतुकीत बदल केले असून शहरातले महत्त्वाचे रस्ते वाहतुकीसाठी बंद ठेवले जाणार आहेत.

**छत्रपती संभाजीनगर** महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांनी शहरातल्या विविध विसर्जन विहिरी आणि कृत्रिम तलावांची पाहणी करून पूर्वतयारीचा आढावा घेतला. लातूर शहरातल्या विसर्जन मार्गावर वाहतूक बंद करुन पर्यायी मार्गाने वाहतूक वळवण्यात येणार आहे.

दरम्यान, हिंदू आणि मुस्लिम समुदायांमध्ये सामाजिक सलोखा कायम राखण्याच्या उद्देशानं मुंबई शहर, मुंबई उपनगर आणि राज्यातल्या इतर काही जिल्ह्यांमध्ये मुस्लिम बांधवांनी ईदचा जुलूस १८ तारखेला काढायचा निर्णय घेतला आहे. या पार्श्वभूमीवर राज्य शासनानं ईद-ए-मिलादची सार्वजनिक सुट्टी १६ तारखेऐवजी १८ तारखेला जाहीर केली आहे.

दरम्यान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज मुंबईतल्या प्रसिद्ध लालबागचा राजा गणपतीचं दर्शन घेतलं.

**<><><><><>**

अनेक ठिकाणी आज ईद - ए - मिलाद - उन - नबी  म्हणजेच प्रेषित मोहम्मद पैगंबरांची जयंती उत्साहात साजरी होत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जनतेला त्यानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. प्रेषित मोहम्मद पैगंबरांनी प्रत्येकाला प्रेम आणि बंधुत्वाच्या भावनांना बळ देण्यासाठी प्रेरित केलं, त्यांनी समाजात दया, मानवतेचा प्रसार केला असं राष्ट्रपतींनी शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. प्रेषित हजरत मोहम्मदांची मानवता आणि बंधुभावाची शिकवण निरंतर जगाला मार्गदर्शन करीत राहील असं उपराष्ट्रपतींनी शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. या सणाच्या निमित्ताने सर्वत्र आनंद, समृद्धी, एकोपा आणि सामंजस्याचं दर्शन घडावं, अशी शुभेच्छा प्रधानमंत्र्यांनी व्यक्त केली आहे. राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी ईद ए मिलाद निमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. ईद ए मिलाद हा सण

त्यांच्या प्रेम, दया आणि त्यागाच्या शिकवणीचे स्मरण करुन देतो, असं राज्यपालांनी शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

<><><><>

श्रोते हो, विविध देशात गणेशोत्सव कशा रीतीनं साजरा होतो हे आपण तिथे राहणाऱ्या नागरिकांकडून जाणून घेत आहोत. आकाशवाणी मुंबईवरून रात्री ८ वाजून ५ मिनिटांनी प्रसारित होणाऱ्या राष्ट्रीय बातम्यामध्ये आज आपण जाणून घेणार आहोत, थायलंडमधल्या गणेशोत्सवाविषयी.

<><><><>

दृष्टीहीन आणि कर्णबधिर प्रेक्षकांना चित्रपटांचा आनंद लुटता यावा याकरता चित्रपटगृहात विशिष्ट यंत्रणा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. त्याकरता माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत.

<><><><>

नवी मुंबईच्या दिशेने येणारी एस टी महामंडळाची एक बस काल रात्री रायगड जिल्ह्यातल्या पाचाड आणि कोंझर दरम्यानच्या घाटात अपघातग्रस्त झाली. अवघड वळणावर चालकाचं नियंत्रण सुटल्यानं ही बस ५० फूट खोल दरीत कोसळली. बसमधील सर्व प्रवासी सुखरूप असल्याचं सूत्रांनी कळवलं आहे.

<><><><>

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात पैठण इथल्या जायकवाडी धरणाचा पाणीसाठा ९९ टक्क्याच्या वर गेला आहे. धरणात सध्या अडीच हजार घनफूट प्रतिसेकंद वेगानं पाण्याची आवक सुरु असून, उजव्या कालव्यातून पाण्याचा विसर्ग सुरु आहे.

//<><><><>//